# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## **कला मंडळ**

पुढारी | पुणे, गुरुवार
२० सप्टेंबर २०१८

### कोणत्याही क्षेत्रात सर्वोत्तमाचा ध्यास घ्या

#### सहाय्यक जिल्हाधिकारी आयुष प्रसाद : 'प्रशासकीय सेवेतील संधी' विषयावर मार्गदर्शन




राजगुरुनगर : प्रसंगी 'प्रशासकीय सेवेतील संधी' या विषयावर बोलताना सहायक जिल्हाधिकारी आयुष प्रसाद.

राजगुरुनगर, दि. २० (प्रतिनिधी) - बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे क्षेत्र कोणतेही असले की त्यात सर्वोत्तमाचा ध्यास घेतला तरचं आपलं जगणं अर्थपूर्ण होईल, असे प्रतिपादन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा खेडचे उपविभागीय अधिकारी आयुष प्रसाद यांनी केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात कला मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी 'प्रशासकीय सेवेतील संधी' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. तानाजी शिंदे, प्रा. अनिल कुलकर्णी, डॉ. कैलास सोनवणे, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते.

आयुष प्रसाद म्हणाले, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा आता स्थानिक पातळीवर राहिली नसून ती राज्य, देशाच्या पातळीपर्यंत पोचली आहे. विद्यार्थ्यांनी नेमक्या दृष्टिकोनाने अभ्यासाविषयी बांधिलकी ठेवून नियोजनपूर्वक प्रयत्न केले तर नक्की यश मिळेल. त्यासाठी विचारांमध्ये सुस्पष्टता (पान ४ पहा)

पान १ वरुन

### ...सर्वोत्तमाचा ध्यास घ्या

आणि अभ्यासक्रमातील सर्व संकल्पना स्पष्ट असायला हव्यात. यावेळी त्यांनी प्रशासकीय सेवांची माहिती देताना सेवाभाव महत्त्वाचा असल्याचे सांगून समाजासाठी काम करायचे असेल तरच प्रशासनात या असे सांगितले. शिक्षणाच्या दर्जाबाबत चिंता व्यक्त करताना ते म्हणाले की शाळा- महाविद्यालयात भौतिक सुविधांवर भर दिला जातो. मात्र त्यामध्ये शिक्षक - विद्यार्थी यांचे नाते सुसंवादी आहे की नाही याकडे लक्ष दिले जात नाही. शिक्षकाने पाठ्य पुस्तकांव्यतिरिक्त अधिकचा अभ्यास करून आपले अध्यापन प्रभावी करताना ते अधिकाधिक विद्यार्थीभिमुख होण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर डॉ. कैलास सोनवणे यांनी आभार मानले.

लोकमत पुणे, गुरुवार, दि. २० सप्टेंबर २०१८

# विद्यार्थ्यांनी सर्वोत्तमाचा ध्यास घ्यावा : प्रसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे क्षेत्र कोणतेही असले तरी त्यात सर्वोत्तमाचा ध्यास घेतला तरच आपलं जगणं अर्थपूर्ण होईल, असे प्रतिपादन सहायक जिल्हाधिकारी तथा खेड उपविभागीय अधिकारी आयुष प्रसाद यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात कला मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी 'प्रशासकीय सेवेतील संधी' या विषयावर बोलत होते.

अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. तानाजी गीते, प्रा. अनिल कुलकर्णी, डॉ. कैलास सोनवणे, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते.

आयुष प्रसाद म्हणाले, की विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा आता स्थानिक पातळीवर राहिली नसून ती राज्य, देशाच्या पातळीपर्यंत पोहोचली आहे. विद्यार्थ्यांनी नेमक्या दृष्टिकोनाने अभ्यासाविषयी बांधिलकी ठेवून नियोजनपूर्वक प्रयत्न केले तर नक्की यश मिळेल.

शिक्षणाच्या दर्जाबाबत चिंता व्यक्त करताना ते म्हणाले, की शाळा-महाविद्यालयात भौतिक सुविधांवर भर दिला जातो. मात्र त्यामध्ये शिक्षक-विद्यार्थी यांचं नातं सुसंवादी आहे की नाही, याकडे लक्ष दिले जात नाही. शिक्षकाने पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त अधिकचा अभ्यास करुन आपले अध्यापन प्रभावी करताना ते अधिकाधिक विद्यार्थीभिमुख होण्यासाठी प्रयत्नशील असायला हवं, असे सांगितले. डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. डॉ. कैलास सोनवणे यांनी आभार मानले.

प्रभात | जिल्हा | शुक्रवार, दि. २१ सप्टेंबर २०१८




राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात कला मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना आयुष प्रसाद.

# लोकसेवेसाठी प्रशासनात या

## आयुष प्रसाद यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

राजगुरुनगर, ता. २० : "सेवाभाव महत्त्वाचा असून समाजासाठी काम करायचे असेल तरच प्रशासनात या. या ठिकाणी करिअर होईल, पण कष्टही आहेत. सर्वस्व ओतून काम करावे लागते, याचेही भान ठेवा," असे प्रतिपादन सहायक जिल्हाधिकारी तथा खेडचे उपविभागीय अधिकारी आयुष प्रसाद यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात कला मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी 'प्रशासकीय सेवेतील संधी' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. तानाजी गिते, प्रा. अनिल कुलकर्णी, डॉ. कैलास सोनवणे, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते.

आयुष प्रसाद म्हणाले, "बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संधी निर्माण झाल्या आहेत. विद्यार्थ्यांनी नेमक्या दृष्टिकोनाने अभ्यासाविषयी बांधिलकी ठेवून नियोजनपूर्वक प्रयत्न केले तर नक्की यश मिळेल. त्यासाठी विचारांमध्ये सुस्पष्टता आणि अभ्यासक्रमातील सर्व संकल्पना स्पष्ट असायला हव्यात."

"शाळा- महाविद्यालयात भौतिक सुविधांवर भर दिला जातो. मात्र शिक्षक - विद्यार्थी यांचे नाते सुसंवादी आहे की नाही याकडे लक्ष दिले जात नाही. शिक्षकाने अधिकचा अभ्यास करून आपले अध्यापन अधिकाधिक विद्यार्थीभिमुख होण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे," असे ते म्हणाले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. कैलास सोनवणे यांनी मानले.

२८ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०१८/४

खेड | राजगुरुनगर

# कार्यक्षेत्रापेक्षा सर्वोत्तमाचा ध्यास घ्या

## कला मंडळचे उद्घाटन : सहायक जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांचे मत

राजगुरुनगर, (प्रतिनिधी) - बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे क्षेत्र कोणतेही असले तरी त्यात सर्वोत्तमाचा ध्यास घेतला, तरच आपले जगणे अर्थपूर्ण होईल, असे प्रतिपादन सहायक जिल्हाधिकारी तथा खेडचे उपविभागीय अधिकारी आयुष प्रसाद यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात कला मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी 'प्रशासकीय सेवेतील संधी' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या वेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर,




प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. तानाजी गिते, प्रा. अनिल कुलकर्णी, डॉ. कैलास सोनवणे, प्रा. किशोर लांडे पाटील, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते.

आयुष प्रसाद पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा आता स्थानिक पातळीवर राहिली नसून, ती राज्य, देशाच्या पातळीपर्यंत पोचली आहे. विद्यार्थ्यांनी नेमक्या दृष्टिकोनाने अभ्यासाविषयी बांधिलकी ठेवून नियोजनपूर्वक प्रयत्न केले, तर नक्की यश मिळेल. त्यासाठी विचारांमध्ये सुस्पष्टता आणि सर्व संकल्पना स्पष्ट असायला हव्यात. त्यांनी प्रशासकीय सेवांची माहिती देताना सेवाभाव महत्त्वाचा असल्याचे सांगून समाजासाठी काम करायचे असेल, तरच प्रशासनात या असे सांगितले.

शिक्षणाच्या दर्जाबाबत चिंता व्यक्त करताना ते म्हणाले की, शाळा-महाविद्यालयात शिक्षक-विद्यार्थी यांचे नाते सुसंवादी हवे. अध्यापन प्रभावी करताना ते अधिकाधिक विद्यार्थीभिमुख होण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे, असे सांगितले.

सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले. डॉ. कैलास सोनवणे यांनी आभार मानले.

जनप्रवास

शुक्रवार, दि. २१ सप्टेंबर २०१८

# सर्वोत्तमाचा ध्यास घ्या : आयुष प्रसाद

राजगुरुनगर । वार्ताहर

बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे क्षेत्र कोणतेही असले तरी त्यात सर्वोत्तमाचा ध्यास घेतला तरच आपलं जगणं अर्थपूर्ण होईल असे प्रतिपादन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा खेडचे उपविभागीय अधिकारी आयुष प्रसाद यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात कला मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी 'प्रशासकीय सेवेतील संधी' या विषयावर बोलत होते.



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात कलामंडळ उद्घाटनप्रसंगी बोलताना प्रांताधिकारी आयुष प्रसाद.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, डॉ.तानाजी गिते, प्रा.अनिल कुलकर्णी, डॉ. कैलास सोनवणे, प्रा.किशोर लांडेपाटील, प्रा.दिलीप मुळूक उपस्थित होते.

आयुष प्रसाद पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा आता स्थानिक पातळीवर राहिली नसून ती राज्य, देशाच्या पातळीपर्यंत पोचली आहे.

विद्यार्थ्यांनी नेमक्या दृष्टिकोनाने अभ्यासाविषयी बांधिलकी ठेऊन नियोजनपूर्वक प्रयत्न केले तर नक्की यश मिळेल. त्यासाठी विचारांमध्ये सुस्पष्टता आणि अभ्यासक्रमातील सर्व संकल्पना स्पष्ट असायला हव्यात.

त्यांनी प्रशासकीय सेवांची माहिती देताना सेवाभाव महत्त्वाचा असल्याचे सांगून समाजासाठी काम करायचे असेल तरच प्रशासनात या असे सांगितले. शिक्षणाच्या दर्जाबाबत चिंता व्यक्त करताना ते म्हणाले की शाळा- महाविद्यालयात भौतिक सुविधांवर भर दिला जातो. मात्र त्यामध्ये

शिक्षक - विद्यार्थी यांचं नातं सुसंवादी आहे की नाही याकडे लक्ष दिले जात नाही. शिक्षकाने पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त अधिकचा

अभ्यास करुन आपले अध्यापन प्रभावी करताना ते अधिकाधिक विद्यार्थीभिमुख होण्यासाठी प्रयत्नशील असायला हवं, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ. कैलास सोनवणे यांनी मानले.

सकाळ
शुक्रवार, २१ सप्टेंबर २०१८ | ४

# सर्वोत्तमाचा ध्यास घेतला तरच जगणं अर्थपूर्ण : प्रसाद

राजगुरुनगर : प्रतिनिधी

बदलत्या काळानुसार प्रत्येक क्षेत्रात संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे क्षेत्र कोणतेही असले तरी त्यात सर्वोत्तमाचा ध्यास घेतला तरच आपले जगणं अर्थपूर्ण होईल, असे मत प्रांताधिकारी आयुष प्रसाद यांनी व्यक्त केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात कला मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी 'प्रशासकीय सेवेतील संधी' या विषयावर ते बोलत होते.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रांताधिकारी आयुष प्रसाद.

अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. तानाजी शिंदे, प्रा. अनिल कुलकर्णी, डॉ. कैलास सोनवणे, प्रा. किशोर लांडे पाटील, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते. आयुष प्रसाद म्हणाले की, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा ही आता स्थानिक पातळीवर न राहता देश पातळीवर पोहचली आहे. विद्यार्थ्यांनी नियोजनपूर्वक प्रयत्न केले, तर नक्की यश मिळेल. त्यासाठी विचारांमध्ये सुस्पष्टता आणि अभ्यासक्रमातील सर्व संकल्पना स्पष्ट असायला हव्यात. समाजासाठी काम करायचे असेल तरच प्रशासनात या, असेही त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले तर, डॉ. कैलास सोनवणे यांनी आभार मानले.

> शाळा-महाविद्यालयात भौतिक सुविधांवर भर दिला जातो. मात्र शिक्षक-विद्यार्थी यांचे नाते सुसंवादी आहे की नाही, याकडे लक्ष दिले जात नाही. शिक्षकाने अध्यापन अधिकाधिक विद्यार्थीभिमुख होण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे.
>
> – आयुष प्रसाद, प्रांताधिकारी

केसरी पुणे, २२ सप्टेंबर २०१८

# क्षेत्र कोणतेही असले तरी त्यात सर्वोत्तमाचा ध्यास घ्या : आयुष प्रसाद

राजगुरुनगर, (वार्ताहर) : बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे क्षेत्र कोणतेही असले तरी त्यात सर्वोत्तमाचा ध्यास घेतला तरचं आपलं जगणं अर्थपूर्ण होईल, असे प्रतिपादन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा खेडचे उपविभागीय अधिकारी आयुष प्रसाद यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात कला मंडळाच्या उदघाटन प्रसंगी 'प्रशासकीय सेवेतील संधी' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, डॉ.तानाजी गिते, प्रा. अनिल कुलकर्णी, डॉ. कैलास सोनवणे, प्रा.किशोर लांडेपाटील, प्रा.दिलीप मुळूक उपस्थित होते.

आयुष प्रसाद पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा आता स्थानिक पातळीवर राहिली नसून ती राज्य, देशाच्या पातळीपर्यंत पोचली आहे. विद्यार्थ्यांनी नेमक्या दृष्टिकोनाने अभ्यासाविषयी बांधिलकी ठेऊन नियोजनपूर्वक प्रयत्न केले तर नक्की यश मिळेल. त्यासाठी विचारांमध्ये सुस्पष्टता आणि अभ्यासक्रमातील सर्व संकल्पना स्पष्ट असायला हव्यात. त्यांनी प्रशासकीय सेवांची माहिती देताना सेवाभाव महत्त्वाचा असल्याचे सांगून समाजासाठी काम करायचे असेल तरच प्रशासनात या असे सांगितले.

शिक्षणाच्या दर्जाबाबत चिंता व्यक्त करताना ते म्हणाले की शाळा–महाविद्यालयात भौतिक सुविधांवर भर दिला जातो. मात्र त्यामध्ये शिक्षक – विद्यार्थी यांचं नातं सुसंवादी आहे की नाही याकडे लक्ष दिले जात नाही. शिक्षकाने पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त अधिकचा अभ्यास करून आपले अध्यापन प्रभावी करताना ते अधिकाधिक विद्यार्थीभिमुख होण्यासाठी प्रयत्नशील असायला हवं, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ. कैलास सोनवणे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख